# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २७.०४.२०२६ सोमवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कपिलनगर :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २५.०४.२०२६ चे २१.१० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे हिमांशु संजय कोहाळ, वय २२ वर्षे, रा. म्हाडा क्वॉर्टर, बिल्डींग नं. ७८, क्वॉर्टर नं. १२२१, नारी रोड, कपिलनगर, नागपूर हा पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत, बोधीवृक्ष बुध्द विहार, म्हाडा कॉलोनी, नारी रोड येथे बसलेला असतांना, तेथे आरोपी क्र. १) रोस्टींग उर्फे हनी रॉबर्ट ॲन्थोनी, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ३८, नारा रोड जरीपटका, नागपूर व त्याचे ईतर तीन मित्र साथीदार हे एका ऑटोने आले. आरोपींनी संगणमत करून, जुने भांडणाचे कारणावरून फिर्यादीचे मुलाला हातबुक्कीने मारहाण केली. तसेच, आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे मुलाला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने धारदार शस्त्राने त्याचे पाठीवर, पृष्ठभागावर वार करून गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यास उपचारकामी मेयो हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी श्रीमती निशा संजय कोहाळ, वय ४५ वर्षे, रा. म्हाडा क्वॉर्टर, बिल्डींग नं. ७८, क्वॉर्टर नं. १२२१, नारी रोड, कपिलनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कपिलनगर येथे पोउपनि. शंकर निलपत्रेवार ९८८११२६९०२ यांनी आरोपींविरूध्द कलम १०९(१), ११५(२), ३(५) भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला. कपिलनगर पोलीसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता त्वरीत दखल घेऊन, आरोपीचा शोध घेतला व आरोपी नामे रोस्टींग उर्फे हनी रॉबर्ट ॲन्थोनी, वय २४ वर्षे, रा प्लॉट नं. ३८, नारा रोड, जरीपटका, नागपूर यास अटक केली आहे. ईतर आरोपींचा शोध सुरू पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २६.०४.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक २७.०४.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, प्लॉट क्र. १२७, एकता हाऊसिंग सोसायटी, मोहीत नगर, बहादुरा, नागपुर येथे राहणारे फिर्यादी मनोहर पांडुरंग नवघरे, वय ४३ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह नातेवाईकाचे घरी वेळाहरी येथे मुक्कामी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करुन, बेडरुममधील लोखंडी आलमारीतील रोख ५,०००/— रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,३८,५००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. महेश पांडे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे अजनी :—** चंदन गणेश माली, वय १९ वर्षे, रा. चिंतामणी नगर नं. ०१, बेसा रोड, के./ऑफ वेदप्रसाद यांचे बिल्डींगमध्ये, नागपूर हे दिनांक २३.०४.२०२६ चे ०९.०० वा. पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— कत्थ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— उजव्या हातावर ''चंदन'' नांव गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :—** मनोज जगनजी गजभीये, वय ४५ वर्षे, रा. संकल्प नगर, वाठोडा ले—आऊट, प्लॉट नं. ६४, वाठोडा, नागपूर हे दिनांक २४.०४.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीतील मेडीकल हॉस्पीटल वॉर्ड नं. ८७ येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे, अंगात— पांढरे क्रिम रंगाचे चौकडीचे शर्ट व काळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— उजव्या हातावर ''मनोज'' नांव गोंदलेले आहे.


चंदन


मनोज

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१८९३/ २००७ | कलम ४२०, ५०६ भा.दं.वि. | १) आसीफ अली, वय ३२ वर्षे, रा. प्रतापनगर, मंजेरी टेक्सटाईल्स जवळ, प्लॉट क्र. २९, नागपुर.<br>२) मनिषा एच. सोमकुंवर, वय २५ वर्षे, रा. कुकडे ले—आऊट, प्लॉट क्र. १०२, ठवरे शाळेजवळ, नागपूर.<br>३) नजमा उर्फ मुन्नी एम. पारेख, वय ४० वर्षे, रा. छावनी, दुर्गा मंदीर समोर, जमील मास्टरचे घरी किरायाने, नागपूर. | ०८.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ४) मोहम्मद सलीम, वय ४७ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३६, वऱ्हाडे ले–आऊट, दुर्गा माता मंदीरचे मागे, सदर, नागपूर. | |
| २. | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०५०१२५ /२००३ | कलम ४५७,३८०, ३४ भा.दं.वि. | संजु ओ. सोनी, वय २० वर्षे, रा. मिनी माता नगर, पाच झोपडा, कपील लिल्हारे चे घराजवळ, कळमना, नागपूर. | २९.०४.२०२६ |

**स्वा/–**

**( मनोज राऊत )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**